
## 7.3 Institutional Distinctiveness

1. **Activities on Environmental Problems**





नवराष्ट्र | 19 सप्टेंबर 2022

# ओझोन दिन साजरा

अर्जुनी मोरगाव, (वा.). स्थानिक शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयात जागतिक ओझोन दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. के. जे. सीबी, प्रा. लक्ष्मीकांत कापगते, डॉ. एम. आर. दवें उपस्थित होते. डॉ. के. जे. सीबी यांनी 'ओझोन' या विषयावर प्रकाश टाकला तर प्रा. लक्ष्मीकांत कापगते यांनी 'ओझोन वायूचे संवर्धन' ही काळाची गरज असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले यांनी प्रत्येकांनी वृक्ष लागवड केली पाहिजे, किमान दोन वृक्ष लावून वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढवावे लागेल, ही सर्वांची जबाबदारी आहे, असे मत मांडले. डॉ. एम. आर. दवें यांनी ओझोनचा ऱ्हास या विषयावर चित्रफित दाखविली. प्रास्ताविक प्रा. राजेश डोंगरवार यांनी केले. संचालन बादल गणवीर याने केले.

"नवराष्ट्र" ला संपर्क करा
■ फोन (0712) 2284001,02,03 संपादकीय 2284005, जाहिरात 2284007, प्रसार 2284006.
■ E-Mail-rb.newsdesk@navabharatmedia.com अकोला (0724)2457560, अमरावती (0721) 2550036, यवतमाळ – वर्धा –(07152) 245062 चंद्रपूर (07172) 261624, गडचिरोली (07132) 234400, गोंदिया (07182) 237389, भंडारा (07184) 257483 मुंबई-(022) 27565117, पुणे-(020) 41042121, नाशिक (0253) 32582960, दिल्ली (011) 23354237/8






लोकमत समाचार शुक्रवार, 23 सितंबर 2022 epaper.lokmat.com/lokmatsamachar 3

# जायस्वाल कॉलेज में ओजोन दिवस

कार्यक्रम में मार्गदर्शन करते प्राचार्य मोहुर्ले, प्रा. सीबी, डा. दवें एवं अन्य.

**अर्जुनी मोरगांव:** शिवप्रसाद जायस्वाल महाविद्यालय में विश्व ओजोन दिवस मनाया गया. प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले की अध्यक्षता में आयोजित कार्यक्रम में डॉ. के. जे. सीबी, प्रा. लक्ष्मीकांत कापगते, डॉ. एम. आर. दवें अतिथि के रूप में उपस्थित थे. डॉ. सीबी ने ओजोन विषय पर प्रकाश डाला. प्रा. कापगते ने ओजोन गैस के संवर्धन की जरूरत पर जोर दिया. डॉ. दवें ने ओजोन के ह्रास विषय पर फिल्म दिखाई. प्रस्तावना प्रा. राजेश डोंगरवार ने रखी. संचालन बादल गणवीर तथा आभार प्रदर्शन शालिनी गेडाम ने किया.





मार्गदर्शन करताना मान्यवर

# जायस्वाल महाविद्यालयात वन्यजीव सप्ताहाचे आयोजन

◆ **अर्जुनी मोर, ६ ऑक्टोबर**

स्थानिक एस. एस. जायस्वाल महाविद्यालयात १ ते ७ ऑक्टोबरदरम्यान जागतिक वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहाच्या उद्‌घाटीकीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयक्यूएसी विभागाचे समन्वयक डॉ. के. जे. सीबी होते. मार्गदर्शक म्हणून ग्रंथपाल प्रा. अजय राऊत होते.

प्रास्ताविकातून भूगोल विभाग प्रमुख डॉ. एम. आर. दर्वे यांनी वन्यजीव आणि मानव यांच्यात होत असलेल्या संघर्षाचे उदाहरण देत हा संघर्ष कशाप्रकारे कमी करता येईल याबाबत मार्गदर्शन करीत कार्यक्रम आयोजनामागील भूमिका विशद केली. प्रा. राऊत यांनी पावर पॉईंट प्रेझेंटेशनच्या साहाय्याने 'सेव्ह बर्ड सेव्ह नेशन' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. के. जे. सीबी यांनी वन्यजीव-मानव आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखण्यासाठी सर्वांनी कसोशीने प्रयत्न करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन बीएससी तृतीय वर्षाची विद्यार्थिनी मयुरी गौतम हिने, तर आभार प्रा. राजेश डोंगरवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. एम. आर. दर्वे, प्रा. राजेश डोंगरवार, दुष्यंत सूर्यवंशी, श्रद्धा कुंभरे, तुषार नाकाडे, अजित ठलाल आदी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. ◄(*तभा वृत्तसेवा*)

## आ. रहांगडालेंच्या हस्ते भूमिपूजन

**तिरोडा** : जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ५०५४ जिल्हा वार्षिक नियोजनांतर्गत तालुक्यातील बिहिरिया ते चांदोरी खु. व अंतर्गत रस्ता बांधकामाचे भूमिपूजन आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी जिप सदस्य चत्रभुज बिसेन होते. याप्रसंगी हुपराज जमईवार, मदन पटले, गणेश मेश्राम, वीरेंद्र मेश्राम, शिवचरण अंबुले, उमाशंकर जमईवार, ग्रामसेवक मेश्राम, नागरिक उपस्थित होते. ■

नवराष्ट्र

## पक्षितज्ज्ञ किरण पुरंदरे यांचा तरुणाईला संदेश

# निसर्गाकडून दातृत्व शिका !

**अर्जुनी मोरगाव, (वा.).** निसर्ग आपल्याला सतत काहीतरी देतच असते. निसर्ग आपल्या कोणत्याही घटकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करत नाही. सर्वांना आपल्या कोणत्या ना कोणत्या गोष्टीची दान तो सदैव करत असतो. आपणही निसर्गाची ही दातृत्व शक्ती अंगीकारली पाहिजे. प्रत्येकाने किमान एक झाड जरी लावले तरी ही पृथ्वी हिरवीगार झाल्याशिवाय राहणार नाही. सोबतच विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच एक तरी छंद जोपासायला पाहिजे, जसे झाडे लावणे, निसर्ग आधारित रांगोळी काढणे, अभिनय करणे, पक्षी पाहणे, नाटके पाहणे इत्यादी. विद्यार्थ्यांनी आयुष्यात इतके यश मिळवले पाहिजे की इतरांनी बघितले तरी त्यांचे डोळे दिपले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आयुष्यात गरुडासारखी झेप घ्यायला हवी, असा मौलिक संदेश ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ किरण पुरंदरे यांनी दिला.

स्थानिक शिवप्रसाद सदानंद जयस्वाल महाविद्यालयाच्या वार्षिक उत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष लुनकरण चितलांगे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. श्याम मोहरकर, प्राचार्य डॉ. हिराजी बनपूरकर, प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले, संस्था सदस्य डॉ. कैलास गाडेकर, ममता जयस्वाल, वार्षिकोत्सव



प्रभारी डॉ. मीनाक्षी तडस, सहप्रभारी डॉ. शरद मेश्राम, आयक्यूएसी समन्वयक डॉ. के.जे. सीबी उपस्थित होते. संस्था संस्थापक श्रद्धेय शिवप्रसादजी यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी माजी प्राचार्य डॉ. श्याम मोहोरकर यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे पंख लावून भरारी घेतली पाहिजे, असे सांगत समाजाच्या शिक्षणाचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी असावा. सदर स्थितीत ग्रंथांचा वापर मोबाइलपेक्षा कमी प्रमाणात होत असल्याचे निदर्शनात येत आहे, यावर खंत व्यक्त केली. विधार्थ्यांनी गंभीरते वाचन करावे, शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांनी मन-मनगट आणि शरीर सौष्ठव मजबूत करावे, असे सांगितले. वार्षिकोत्सव निमित्ताने विविध क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच बौधिक स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय आलेल्या स्पर्धकांना प्राचार्य तसेच प्रमुख अतिथींच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. पांडुरंग डांगे, प्रा. रवी ठवरे, डॉ. सुधाकर झांबरे, प्रा. श्रीकांत नाकाडे यांचे सत्कार शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन अतिथींच्या हस्ते करण्यात आले. संस्थाध्यक्ष लुनकरण चितलांगे यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिकोत्सवाचा बक्षीस वितरण व सांगता समारंभ पार पडला. कुरखेडा येथील गोविंदराव मुनघाटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजा मुनघाटे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. याप्रसंगी संस्था उपाध्यक्ष बद्रीप्रसाद जयस्वाल, संस्था सचिव मुकेश जयस्वाल, सहसचिव नामदेव कापगते उपस्थित होते. डॉ. मुनघाटे यांनी यशस्वी होण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. जो प्रयत्न करेल तोच यशस्वी होत असतो, असे मत मांडले. प्रास्ताविक डॉ. मीनाक्षी तडस यांनी मांडले. संचालन मयुरी गौतम, दीपक ठाकरे केले, तर आभार डॉ. शरद मेश्राम यांनी मानले.

Gondia Edition
13 March 2023 Page No. 4
epaper.navarashtra.com


GPS Map Camera
Warora,MH,India
Anandvan Ward, Warora, 442907, MH, India
Lat 20.253468, Long 79.017614
03/13/2023 01:07 PM GMT+05:30
Note : Captured by GPS Map Camera



नागपुर, 9 जुलाई 2022 | नवभारत | 3

## रेलवे स्थानक परिसर में किया पौधारोपण



■ अर्जुनी मोरगांव (सं). शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, रेलवे अधिकारी व कर्मचारी तथा एवरग्रीन मॉर्निंग वॉक ग्रुप के संयुक्त तत्वावधान में रेलवे स्टेशन परिसर में पौधारोपण किया गया. श्रीदुर्गा शिक्षण संस्था, अर्जुनी / मोरगांव के अध्यक्ष लुनकरण चितलांगे की अध्यक्षता तथा स्टेशन मैनेजर मीना, महाविद्यालय के प्राचार्य डा. ईश्वर मोहुर्ले व डा. कैलास गाडेकर की उपस्थिति में पौधारोपण अभियान चलाया गया. विभिन्न देशी प्रजाति के पौधे लगाए गए, जिसमें कडू नीम, अमलतास, पिपल, आम, कदम्ब आदि का समावेश है. सामाजिक वनीकरण विभाग, अर्जुनी मोरगांव द्वारा पौधे उपलब्ध किए गए. पौधों की सुरक्षा के लिए लोहे की जाली लगाई गई. डा. डी एल चौधरी, प्रा. चंद्रशेखर राखडे, डा. एस बी बोरकर, डा. नितीन विलायतकर, डा. शरद मेश्राम, गिरीश बागडे, अरुण मांडवगणे, ओमप्रकाशसिंह चंदेल, भगवानदास पनपालिया, अनिल जायस्वाल, विनोद महसाखेत्रे, मुकेश शुक्ला, राम जोकयानी, स्पंदन लोणारे, गजानन कोल्हे, शामराव सोनवणे, सुनील लंजे, नरेंद्र नाकाडे, सुनील सहारे, अरुण कुमार भैया, राजू लांजेवार, परमानंद नगराडे, पद्माकर उखरे, विजय खुणे, चंद्रशेखर हलाले, टीकाराम जनबंधु, पवनसिंग पवार, प्रा. अजय राऊत ने पौधारोपण अभियान में सहयोग किया.

नवराष्ट्र | 10 जुलै 2022 | 2

## मोरगाव रेल्वेस्थानक परिसरात वृक्षारोपण



अर्जुनी मोरगाव, (वा.). स्थानिक शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, रेल्वे अधिकारी व कर्मचारी तसेच एव्हरग्रीन मॉर्निंग वॉक ग्रुप अर्जुनी मोरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने येथील रेल्वे स्थानकातील नवनिर्मित प्लॅटफॉर्मवर 8 जुलै रोजी सकाळी 6.30 वाजता वृक्षारोपण मोहीम घेण्यात आली. श्रीदुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लुनकरण चितलांगे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच स्टेशन मॅनेजर मीना, प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले, कैलास गाडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण अभियान संपन्न झाले. याप्रसंगी विविध देशी प्रजातीचे रोपे लावण्यात आले. यात कडूनिंब, अमलतास, पिंपळ, आंबा, कदंब आदींचा समावेश आहे. या मोहिमेकरिता सामाजिक वनीकरण विभाग, अर्जुनी मोरगावतर्फे रोपटे उपलब्ध करून देण्यात आले. रोपट्यांच्या सुरक्षिततेकरिता लोखंडी कठडे लावण्यात आले. याप्रसंगी डॉ. डी. एल. चौधरी, प्रा. चंद्रशेखर राखडे, डॉ. एस. बी. बोरकर, डॉ. नितीन विलायतकर, डॉ. शरद मेश्राम, गिरीश बागडे, अरुण मांडवगणे, ओमप्रकाशसिंह चंदेल, भगवानदास पनपालिया, अनिल जायस्वाल, विनोद भसाखेत्रे, मुकेश शुक्ला, राम जोकयानी, सुनील लंजे, नरेंद्र नाकाडे, सुनील शहारे, अरुणकुमार, राजू लांजेवार, परमानंद नगराळे, पद्माकर उखरे, विजय खुणे, चंद्रशेखर हलाले, टिकाराम जनबंधु, पवनसिंह पवार, प्रा. अजय राऊत आदी उपस्थित होते.

3 गोंदिया | /navarashtra | 21 ऑक्टोबर 2022 | नवराष्ट्र

## 'जग बदलले तुम्हीही बदला' घोषवाक्याने अर्जुनी दुमदुमली

अर्जुनी मोरगाव, (वा.). येथील शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 19 ऑक्टोबर रोजी प्लास्टिक कचरा संकलन व निर्मूलन अभियान राबविण्यात आले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी केलेल्या 'जग बदलले तुम्हीही बदला' घोषवाक्याने अर्जुनी नगरी दुमदुमली होती.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी प्लास्टिक कचरा जमा करण्यासाठी विशेष बॅग तयार करून त्यात महाविद्यालयापासून रेल्वे स्टेशन, जुना बस स्थानक, नवीन बस स्थानक, पंचायत समिती परिसर आदी परिसरातील जवळपास एक क्विंटल प्लास्टिक कचरा संकलित करून महाविद्यालयातील कचरा डेपोमध्ये संकलित करण्यात आला. कचरा गोळा करण्यासाठी स्वयंसेवकांच्या आरोग्याची काळजी घेत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राऊत यांनी हातमोजे प्रदान केले. कचरा संकलन करत असतानाच कचरा होऊ नये, यासाठी बस स्थानकाजवळील मुख्य चौकात विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी प्रबोधनपर पथनाट्य सादर केले. यात प्लास्टिक प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, ग्राम स्वच्छता या विषयावर लोकांचे प्रबोधन केले. यावेळी नगरपंचायत [illegible] जाधव, स्वाती [illegible], सुरेश [illegible], नगरसेवक [illegible], रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, डॉ. प्रदीप भानसे, प्रा. लक्ष्मीकांत [illegible], प्रा. राजेश [illegible], प्रा. कैलास [illegible] तसेच आजूबाजूच्या गावावरून आलेले व नगरातील अनेक नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. पथनाट्यात सहभागी शालिनी [illegible] [illegible] केले. पथनाट्य निर्मितीसाठी [illegible] रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी परिश्रम घेतले. [illegible] कार्यक्रमाची सांगता झाली.

# Activity on Health problems:






## जायस्वाल कॉलेज में कोविड बूस्टर डोज

कर्मचारियों को वैक्सीन लगाती स्वास्थ्य कर्मी.

**अर्जुनी मोरगांवः** स्वतंत्रता के अमृत महोत्सव के उपलक्ष्य में सरकार द्वारा बूस्टर डोज को प्राथमिकता दी जा रही है. शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय और प्राथमिक स्वास्थ्य केंद्र कोरंभीटोला के संयुक्त तत्वावधान में जायस्वाल महाविद्यालय में कोविड बूस्टर डोज मुहिम का आयोजन किया गया. प्राचार्य डॉ.ईश्वर मोहुर्ले के आह्वान पर महाविद्यालय के शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी एवं गांव के नागरिकों ने महाविद्यालय पहुंचकर कोविशील्ड और को-वैक्सीन ली. 62 लोगों ने इस मुहिम का लाभ उठाया. प्राथमिक स्वास्थ्य केंद्र क्रमांक 2 के सुपरवाइजर राजेंद्र कावडे, स्वास्थ्य सेविका लक्ष्मी मुनेश्वर और स्वास्थ्य सेवक संजीव गजबे ने सेवा दी. सफलता के लिए प्राचार्य डॉ.मोहुर्ले के मार्गदर्शन में ग्रंथपाल प्रा.अजय राउत, डॉ.डी.एल.चौधरी, डॉ.गोपाल पालीवाल, सुधाकर नागपुरे, संजय शेंडे समेत अन्य ने प्रयास किए.



# जायस्वाल महाविद्यालय

■ अर्जुनी मोरगांव (सं). शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय के क्रीड़ा संकुल में विश्व योग दिवस महाविद्यालय के प्राचार्य डा. ईश्वर मोहुरले की उपस्थिति में आयोजित किया गया. योग प्रशिक्षक कांतिकुमार बोरकर ने योग करके दिखाया. सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय की शारीरिक शिक्षिका पिल्लारे मेडम उपस्थित थी. कांतिकुमार बोरकर ने योग का महत्व बताया. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना के स्वयंसेवक ने भी योग के बारे में जानकारी हासिल की. राष्ट्रीय सेवा योजना के कार्यक्रम अधिकारी डा.पी.आर. भानसे ने योग के महत्व बताए. सफलतार्थ मेघा जांभुलकर, ईंदू शेंडे, प्रियंका भेंडारकर, आम्रपाली बडोले, योगिता मेंढे, गौतमी मेश्राम, सुप्रिया सोनटक्के, दुर्गा कालसर्पे आदि ने प्रयास किया. आभार कार्यक्रम अधिकारी डा.एम.आर. दरवे ने माना.

Gondia Edition
23-june-2022 Page No. 3
epaper.enavabharat.com



**Activity on Socio-economic problems:**






राष्ट्रीय सेवा योजना
नविन मतदार नाव नोंदणी अभियान


नेहरु युवा केंद्र गोंदिया
GPS Map Camera
Arjuni, Maharashtra, India
R28F+6M6, Arjuni, Maharashtra 441701, India
Lat 20.815394°
Long 80.023251°
25/01/23 11:37 AM
Google

# मतदानकार्ड आधारशी लिंक करण्यावर मार्गदर्शन



अर्जुनी मोरगाव, (वा.). स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी वर्ष अंतर्गत स्थानिक शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयात 18 ऑगस्ट रोजी मतदान ओळखपत्राला आधार कार्डशी लिंक करण्याविषयी मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला.

प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपविभागीय अधिकारी डॉ. विजयकुमार सूर्यवंशी · तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी गणेश सोनोन यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. व्यासपीठावर डॉ.पी.एस. डांगे, प्रा. श्रीकांत नाकाडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, डॉ. प्रदीप भानसे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. सूर्यवंशी यांनी, उपस्थितांना मतदान ओळखपत्राला आधार कार्ड लिंक करणे का आवश्यक आहे तसेच लिंक कसे करायचे याबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य मोहुर्ले यांनी, जे विद्यार्थी सर्वात जास्त लोकांचे मतदान कार्ड आधार कार्डसोबत लिंक करतील व तशी लेखी माहिती देतील, त्या विद्यार्थ्याला महाविद्यालयाच्यावतीने बक्षीस देण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांनी मतदान कार्ड सोबत आधार कार्ड लिंक करण्याबाबत आपल्या घराशेजारी तसेच समाजामध्ये जास्तीत जास्त जनजागृती करण्यासंबंधीचे आवाहन केले. संचालन डॉ. दर्वे यांनी केले तर आभार डॉ. भानसे यांनी मानले. यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दर्वे, डॉ. भानसे, प्रा. डोंगरवार, सांस्कृतिक कार्यक्रम समिती सदस्य प्रा. राऊत, डॉ. तडस, डॉ. बोरकर, प्रा. कापगते आणि रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.



शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना
श्री दुर्गा शिक्षण संस्था, अर्जुनी /मोर.
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान)
अर्जुनी/मोरगांव जि.गोंदिया
GPS Map Camera
Google
Arjuni, Maharashtra, India
R28C+2RJ, Friends Colony Rd, Arjuni, Maharashtra 441701, India
Lat 20.815312°
Long 80.022955°
18/08/22 10:49 AM




Latitude: 20.815215
Longitude: 80.022978
Elevation: 310.16m
Accuracy: 1.9m
Time: 11-26-2022 10:33
Note: Savidhan Din 26Nov.20

# शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर. जि. गोंदिया

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम

## वार्षिक अहवाल सत्र २०२२—२३

---

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वर्षभर नियमित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

- **१४ मे २०२२ : आंतरराष्ट्रीय योग दिनाचा प्रोटोकाल : व्याख्यान**

आंतरराष्ट्रीय योग दिवस २०२२ च्या प्राटोकॉलवर आधारीत युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयाच्या आयुष मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने योगासने व प्राणायामाचे महत्व या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यासाठी व्याख्याते म्हणून सिद्वीविनायक शाळेतील योगशिक्षीका श्रीमती शोभाताई ठाकूर उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या व्याख्यान प्रसंगी विक्रमसिंग ठाकूर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. गोपाल पालीवाल, प्रा. अजय राऊत व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी आपल्या व्याख्यानातून मार्गदर्शन करताना श्रीमती ठाकूर मॅडम यानी प्राणायाम व योगासनाचे काय महत्व आहे, हे विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणे देऊन पटवून दिले. निरोगी जीवन जगण्यासाठी सकारात्मक विचार करण्याची आवश्यकता आहे. यातूनच आपले व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होते. यासाठी भस्त्रिका, अनुलोम विलोम, भ्रामरी प्राणायाम तसेच अनेक आसने महत्वाची ठरतात. हे त्यानी आपल्या मार्गदर्शनातून सांगीतले. अध्यक्षीय भाषणातून प्रा. ईश्वर मोहुर्ले यानी दिवसातील २४ तासांपैकी किमान १ तास योग व प्राणायाम यासाठी राखून ठेवावा कारण निरोगी शरीरातच निरोगी मन वास करते असे मार्मिक विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी प्रास्ताविक भाषणातून विशद केली. कार्यक्रमाचे संचालन प्रेमलता उपरीकर हिने तर उपस्थितांचे आभार मंजली दहिवले हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेघा जांभुळकर, शालीनी गेडाम, विशाल कोल्हे व इतर रासेयोच्या स्वयंसेवकानी परिश्रम घेतले.

https://berartimes.com/148661/via@berartimes

https://www.sanjwarta.com//?/p=37169

- **६ जून २०२२ : स्वराज्याभिषेक दिवस**

शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर. येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ६ जुन २०२२ हा दिवस स्वराज्याभिषेक दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शरद मेश्राम, डॉ. गोपाल पालीवाल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोला माल्यार्पण करुन विद्यार्थी व मान्यवरानी आदरांजली वाहिली. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.

मोतीलाल दर्वे यांनी स्वराज्यभिषेक दिनाची पार्श्वभूमी आपल्या प्रास्ताविकातून विशद केली. त्यानंतर महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शिवाजी महाराजांच्या कार्यकतृत्वाला सिद्ब करणारे गीत बादल गणविर या विद्यार्थ्याने गायले. अजित ठलाल यानी महाराजांच्या राज्याभिषेकावर आधारित पोवाडा सादर केला. प्रमुख अतिथी डॉ. शरद मेश्राम यानी शिवाजी महाराजांच्या जिवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले यांनी कार्यकर्तृत्वाला तोड नसल्याचे सांगून त्याच्या कार्यातून आपण प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले.

त्यानंतर इतिहास संशोधक प्रा. नितीन बानगुडे पाटील यांच्या व्याख्यानाची व्हिडीओ क्लिप विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने झाला कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रासेयो स्वयंसेवक अजित ठलाल, बादल गणवीर, शालीनी गेडाम, मेघा जांभुळकर कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. आर दर्वे तसेच प्रा. अजय राऊत यानी परिश्रम घेतले.

- **२१ जुन २०२२ : आंतरराष्ट्रीय योग दिन**

शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिवस दि. २१ जून २०२२ ला महाविद्यालयाचया क्रिडा संकुलात सोत्साह संपन्न करण्यात झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुले होते. तर मार्गदर्शक म्हणून योग शिक्षक व अभ्यासक श्री कांतीकुमार बोरकर व शारीरिक शिक्षीका कु. पिल्लारे मॅडम उपस्थित होत्या. मार्गदर्शक श्री बोरकर सर यानी विविध आसने व प्राणायाम करुन दाखवित निरोगी जीवनासाठी ते कसे उपयुक्त आहे, हे प्रात्याक्षिकाव्दारे करुन दाखविले. याप्रसंगी सरस्वती ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थीनीना यासाठी प्रशिक्षित विद्यार्थीनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप भानसे यांनी केले. संचालन बादल गणविर यानी तर उपस्थितांचे आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यानी मानले.

- **६ जुलै २०२२ : वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयातील क्रिडा सकुल परिसरात वृक्ष लागवड मोहिम राबविण्यात आली. दरवर्षी कमी होत जाणारे पावसाचे प्रमाण, वाढत जाणारे तापमान त्यामुळे ग्लोबल वार्मिंगचा धोका निर्माण झाला आहे. यासाठी वृक्षांचे महत्व अधिक आहे. दरवर्षी हजारो वृक्षांची तोड केली जाते. दरवर्षी हजारो झाडे लावली जातात मात्र वृक्षारोपण झाल्यानंतर त्याचे संवर्धन व संरक्षण कसे होईल याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे यावर्षी २५ झाडे लावून त्याचे संवर्धन व संरक्षण करण्याचे निश्चित करण्यात आले. झाडांना ट्री गार्ड लावले. रासेयोच्या विद्यार्थ्यांना एका–एका झाडाची निगा राखण्याची जबाबदारी देण्यात आली. वृक्षारोपणामध्ये पिंपळ, अशोक, मोह, जांभुळ, वड यासारख्या रोपटयांची निवड करण्यात आली. वृक्षारोपण कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर माहुर्ले, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, डॉ. प्रदीप भानसे, रासेयो स्वयंसेवक कु. मेघा जांभुळकर, राहूल भेंडारकर, पराग नंदेश्वर, समीर हेडावू, गिरीश ठोंबरे, बादल गणविर, रितु कापगते, सेजल गाहाणे, इंदू शेंडे, गौतमी मेश्राम, शालीनी गेडाम, श्रद्धा कुंभरे, हुमेश्वरी कापगते, आम्रपाली बडोले, यांनी वृक्षारोपण केले. तसेच महाविद्यायातील आयक्युएसी समन्वयक डॉ.

के.जे.सिबी, डॉ. पी.एस.डांगे, प्रा. एस. पी. नाकाडे, डॉ. बी. एम. राठोड, डॉ. मिनाक्षी तडस, प्रा. राजेश डोंगरवार, प्रा. कैलास लोखंडे इत्यादीनी वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेतला.

- **३ ऑगस्ट २०२२ : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त निबंध स्पर्धा**

आपल्या देशाला इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली असल्यामुळे संपूर्ण भारतात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. त्याचे औचित्य साधून संपूर्ण नगरातील शाळा—महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले. निबंध स्पर्धेचा विषय ''देशाचा तिरंगा— राष्ट्रध्वजच देशाची शान आणि मान जगात उंचावू शकतो'' याप्रमाणे होता.

१. प्रथम क्रमांक —तेजस संजय रामटेके — बी.ए. भाग २

२. व्दितीय क्रमांक — रोहीत रामचंद्र वल्थरे — बी.ए. भाग २

३. तृतीय क्रमांक — कु. मानसी होमदेव नेवारे — बी.कॉम. भाग २

- **५ ऑगस्ट २०२२ : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पोस्टर स्पर्धा**

पोस्टर स्पर्धा — विषय — ''तिरंगा है न्यारा''

१. प्रथम क्रमांक — विशाल चंद्रशामजी कोल्हे — बी.ए. भाग ३

२. व्दितीय क्रमांक — कु. मानसी होमदेव नेवारे — बी. कॉम. भाग ३

३. तृतीय क्रमांक — अजित पुंडलिक ठलाल — बी. ए. भाग ३

- **८ ऑगस्ट २०२२ : महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' मार्गदर्शन कार्यक्रम**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शासनाच्या निर्देशानुसार दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या तिन दिवस घरोघरी तिरंगा हा उत्सव म्हणून साजरा करण्याच्या मार्गदर्शक सूचना जनमाणसापर्यंत पाहोचाव्या जेणेकरुन आपल्या देशाची शान व मान असलेला तिरंगा कोणत्याही परिस्थितीत त्याचा अवमान होणार नाही. म्हणून महाविद्यालयातील संपूर्ण विद्यार्थ्यांना ध्वजारोहण करण्यासंबंधाने मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी अर्जुनी/मोर. पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री सोमनाथ कदम साहेब उपस्थित होते. आयक्युएसी समन्वयक डॉ. के. जे. सिबी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदिप भानसे यांनी केले. संचालन कु. मयुरी गौतम या विद्यार्थीनीने केले तर आभारप्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी केले.

- **९ ऑगस्ट २०२२ : रासेयोच्या वतीने क्रांती दिन सोत्साह संपन्न**

इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यानी प्राणांचे बलिदान दिले त्याना आठवण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट अर्थात क्रांती दिन होय. स्वातंत्र्य लढयाची मशाल पेटवत देशातून इंग्रजी राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देणाऱ्या तमाम क्रांतीविराना अभिवादन करण्याचा हा दिवस. पण स्वातंत्र्याचा उपभाग घेण्यात दंग असलेल्या आजच्या पिढीसाठी हा दिवस

अनोळखी झाला आहे. सर्वांच्या हृदयात क्रांतीविरांची ती मशाल आठवणीच्या रुपाने धगधगत राहणे अपेक्षित आहे. या लढयात गोंदिया जिल्हयातील काही लोकांनी हौतात्म्य पत्करले त्यांच्या स्मृती जपण्यासाठी त्या क्रांतीलढयाची आठवण म्हणून तसेच या दिवसाचे महत्व नविन पिढीला माहित व्हावे या उद्देशाने ९ ऑगस्ट २०२२ ला क्रांती दिन निमित्ताने नगरातील शाळा कॉलेजमधील विद्यसर्थ्यांच्या सहभागातून रॅली काढण्यात आली. यात महाविद्यालयातील विद्यार्थी, रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने सहभागी झाले होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षनिमित्त ''घरोघरी तिरंगा'' या शासनाच्या उपक्रमाचा संदेशही या रॅलीतून देण्यात आला. नगरातील शहीद स्मारक याठिकाणी जावून अनेक मान्यवरांनी शहीद स्तंभाला पूष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लुणकरणजी चितलांगे यानी व इतर सर्व मान्यवरानी अभिवादन करुन राष्ट्रगीताने या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी अर्जुनी/मोर. चे तहसिलदार श्री मेश्राम साहेब, एपिआय श्री कदम साहेब, नगराध्यक्ष, नगरसेवक, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रासेयोचे स्वयंसेवक विशाल कोल्हे, मयुरी गौतम व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, डॉ. प्रदीप भानसे तथा प्रा. राजेश डोंगरवार, डॉ. भारत राठोड, प्रा. कैलाश लोखंडे यांनी परिश्रम घेतले.

- **१२ ऑगस्ट २०२२: रासेयोच्या वतीने तिरंगा ध्वज वितरण कार्यक्रम व स्वच्छता अभियान**

दि. १२ ऑगस्ट २०२२ रोज शुक्रवारला घरोघरी तिरंगा उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक याना तिरंगी ध्वज प्रदान करण्यात आला. जेणे करुन त्यानी १३, १४ व १५ ऑगस्ट या प्रत्येक दिवशी राष्टीय ध्वज आपल्या घरावर लावून स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात संपन्न करावा. ज्या क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांच्याप्रती समर्पणाची व त्यागाची भावना सर्व भारतीय नागरीकात सदैव तेवत राहावी हा उद्देश स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त व्यक्त करण्यात आला. सोबतच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महाविद्यालयाच्या परिसरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी श्रमदान केले. या श्रमदानातून त्याना देशाप्रती स्वच्छ भारत अभियानाचे महत्व पटवून देण्यात आले.

- **१३ ऑगस्ट २०२२ : महाविद्यालयात अमृत महोत्सवी ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न**

दि. १३ ऑगस्ट २०२२ रोज शनिवारला शासनाच्या आदेशानुसार सकाळी ठिक ८.०० वाजता श्री दुर्गा शिक्षण सस्थेचे अध्यक्ष मा. श्री लुणकरणजी चितलांगे यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी मा. श्री मुकेशजी जायस्वाल, श्री नंदकिशोरजी राठी तसेच प्रभारी प्राचार्य प्रा. श्रीकांत नाकाडे प्रामुख्याने उपस्थित होते. ध्वजारोहन प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्टीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, डॉ. प्रदीप भानसे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता व रंगरंगोटी करण्यात आली.

- **'' हर घर तिरंगा ''** अंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना घरोघरी तिरंगा फडकविण्यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ध्वज वितरण करण्यात आले.

- **१४ ऑगस्ट २०२२ : ध्वजारोहण व 'विभाजन विभिषिका स्मृती दिन' कार्यक्रम**

दि. १४ ऑगस्ट २०२२ रोज रविवारला सकाळी ८.०० वाजता श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लुणकरणजी चितलांगे यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहन समारंभ संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले व संस्थेचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. सोबतच महाविलयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंयेवक व महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

त्यानंतर याच दिवशी सकाळी ९.०० वा. महाविद्यालयाच्या सभागृहात 'विभाजन विभिषिका स्मृती दिन' कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मंचावर संस्थेचे अध्यक्ष मा. श्री लुणकरणजी चितलांगे, प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले, आयक्युएसी समन्वयक डॉ. के. जे. सिबी, डॉ. भारत राठोड, डॉ. कल्पना सांगोळे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. डॉ. के. जे. सिबी, डॉ. भारत राठोड, डॉ. कल्पना सांगोळे यांची अभ्यासपूर्ण भाषणे झालीत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष कावळे तर आभारप्रदर्शन डॉ. सतिश बोरकर यानी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

- **१५ ऑगस्ट २०२२ : ध्वजारोहण कार्यक्रम व स्पर्धा पुरस्कार वितरण समारोह**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात ठिक ८ वाजता ध्वाजारोहण संपनन झाला. श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री लुणकरणजी चितलांगे यांचे शुभ हस्ते संपन्न झाला. ध्वजारोहण प्रसंगी संस्थेचे सचिव मा. मुकेशजी जायस्वाल, उपाध्यक्ष बद्रिप्रसादजी जायस्वाल तसेच संस्थेचे मा. सदस्य आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, गावातील प्रतिष्ठीत नागरीक प्रामुख्याने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले यानी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यासाठी बलीदान करणाऱ्या क्रांतीकारक व महापूरुषांचे स्मरण करुन दिले.

महाविद्यालयात दि. ३ ऑगस्ट २०२२ व ५ ऑगस्ट २०२२ रोजी अनुक्रमे निबंध व पोस्टर्स स्पर्धा घेण्यात आली. निबंध स्पर्धेत उत्कृष्ठ निबंध लिहिणाऱ्या तेजस संजय रामटेके याने प्रथम, रोहित रामचंद्र वलथरे व्दितीय तर मानसी होमदेव नेवारे हिने तृतीय क्रमांक मिळविला उत्कृष्ठ पोस्टर स्पर्धेत विशाल कोल्हे प्रथम, मानसी नेवारे व्दितीय तर अजित ठलाल याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. काढणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना तसेच देवरी पोलीस स्टेशनने आयोजित केलल्या जिल्हास्तरीय भाषण स्पर्धेत बी.एससी. भाग ३ च्या विद्यार्थीनी कु. मयुरी गौतम हिचा व्दितीय क्रमांक आला. या सर्व विद्यार्थ्यांना दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी नगर पंचायत अर्जुनी/मोर. च्या वतीने आयोजित वात्सल्य सभागृहात गौरविण्यात आले.

- **१७ ऑगस्ट २०२२ : सामुहिक राष्ट्रगाण कार्यक्रम**

महाविद्यालयात दि. १७ ऑगस्अ २०२२ ला सकाळी ११.०० वाजता सामुहिक राष्ट्रगाण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले यानी या कार्यक्रमाची प्रस्तावना केली. राष्ट्रगाणाचे महत्व व आपला देशाभिमान प्रत्येकानी बाळगावा असे मौलिक मनोगतही व्यक्त केले. यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

- **मतदान ओळखपत्र आधार कार्डशी लिंक करण्याबाबत मार्गदर्शन कार्यक्रम**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी वर्ष अंतर्गत महाविद्यालयात १८ ऑगस्ट २०२२ ला मतदान ओळखपत्र आधार कार्डाशी लिंक करण्याविषयी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले अध्यक्षस्थानी होते. तर मर्दिर्शक म्हणून अर्जुनी/मोर चं उपविभागीय अधिकारी डॉ. विजयकुमार सुर्यवंशी तसेच सहाय्यक मतदार अधिकारी श्री गणेश सोनोने उपस्थित होते. डॉ. सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मतदान ओळखपत्र आधार कार्डला लिंक करण्याची आवश्यकता व ते कसे करावे याविषयी माहिती दिली. श्री सोनाने यांनी त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. सोबतच विद्यार्थ्यांनी आपल्या अवतीभवतीच्या लोकांचे आधार कार्ड लिंक करुन देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल असे जाहिर केले. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी तर आभरप्रदर्शन डॉ. प्रदीप भानसे यांनी केले.

- **सद्‌भावना पंधरवडा : २० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २०२२**

महाविद्यालयात सद्‌भावना पंधरवडयानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. दि. २१ ऑगस्ट २०२२ सद्‌भावना शपथ कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत मा.श्री उमेश राऊत यांच्या मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. २२ ऑगस्ट २०२२ ला श्रमदान सत्र राबविण्यात आले. दि. १ सप्टेंबर २०२२ गीतगायन स्पर्धा घेण्यात आली. २ सप्टेंबर २०२२ ला वक्तृत्व स्पर्धा, ३ सप्टेंबर २०२२ ला स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धा व ५ सप्टेंबर २०२२ शिक्षक दिवस कार्यक्रम घेण्यात आला.

- **आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्य Digital Literacy या विषयावर व्याख्यान**

शिक्षणानेच देशाची समृद्धी संभव आहे. त्यावर अधिक लक्ष दिले जात असताना शिक्षणातील नवे प्रवाह देखील आपणास स्विकारावे लागतील असे मौलिक विचार दि. ८ सप्टेंबर २०२२ ला आयोजित Digital Literacy या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक पदावरुन आयक्युएसी सपन्वयक डॉ. के. जे. सिबी बोलत होते. ते पुढे म्हणाले की आज साक्षरतेची व्याख्या बदलली असून अलिकडच्या काळात डिजिटल साक्षरता ही टायपिंग किंवा किंवा डिजिटल मिडीया प्लॅटफॉर्मचा वापर करुन माहिती शोधण्याची, मूल्यमापन करण्याची आणि संप्रेषण करण्याची व्यक्तीची क्षमता आहे. माहिती तयार करणे, मूल्यमापन करणे आणि माहिती सामायिक करणे यासाठी माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान वापरण्याच्या तांत्रिक आणि सकारात्मक क्षमतेचे हे संयोजन आहे. त्याचा अंगीकार करण्याची क्षमता आपल्यात आत्मसात करण्याची आवश्यकता डॉ. सिबी यांनी व्यक्त केली. अध्यक्षपदावरुन प्रा. श्रीकांत नाकाडे यांनी समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी केले. संचालन अजित ठलाल व आभार शलीनी गेडाम या विद्यार्थीनीने मानले.

- **कार्यक्रम कॅशलेस इंडिया' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन**

दि. २४ सप्टेंबर २०२२ ला राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे औचित्य साधून 'कॅशलेस इंडिया' या विषयावर प्रा लक्ष्मीकांत कापगते यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यानाचे आयोजित करण्यात आले. काळाची गरज ओळखून आपणही बदलले पाहिजे, संपूर्ण आर्थिक व्यवहार हे कॅशलेस होत असताना आपणही मागे पडू नये त्यासाठी आपणास डिजिटल साक्षर व्हावे

लागेल हा विचार आपल्या ओघवत्या शैलीतून प्रा. कापगते योनी व्यक्त केला. प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग डांगे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात त्यानीही समयोचित भाषण केले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी तर संचालन मयुरी गौतम हिने तर आभारप्रदर्शन अजित ठलाल यांनी केले. यावेळी मंचावर प्रा. राजेश डोंगरवार, प्रा. कैलाश लोखंडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रासेयो स्वयंसेवक बादल गणविर, श्रद्धा कुंभरे, शालीनी गेडाम, शशीकांत गेडाम विशाल कोल्हे, पराग नंदेश्वर वैष्णवी नाकाडे, वैष्णवी बोरकर यामिना नागोसे, ओमप्रकाश हुकरे, राहुल भेंडारकर ई. नी परिश्रम घेतले. .

- **रासेयो स्थापना दिवस कार्यक्रमाचे आयोजन**

रासेयो विद्यार्थ्यांना या राष्ट्रीय सेवा योजनेची जाणीव व्हावी या उद्देशाने महाविद्यालयात रासेयो स्थापना दिवस दि. २४ सप्टेंबर २०२२ ला घेण्यात आला. यासाठी मार्गदर्शक म्हणून आयक्युएसी समन्वयक डॉ. सिबी तसेच प्रा. राजेश डोंगरवार उपस्थित होते. डॉ. सिबी यांनी महात्मा गांधी यांच्या स्वप्नपूर्तीचा उल्लेख करीत या योजनेची उदिदृष्टे विशद केली. प्रा. डोंगरवार यानी रासेया च्या स्वयंसेवकाची कर्तव्य काय आहेत हे समजावून सांगीतली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी तर संचालन मयुरी गौतम हिने व आभारप्रदर्शन अजित ठलाल यांनी केले.

- **कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत मा. श्री उमेश राऊत यांचे व्याख्यान**

सदभावना पंधरवडा साजरा करीत असताना दि. १ सप्टेंबर २०२२ ला विद्यार्थ्यांना कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत 'नेटवर्क मार्केटिंग बदलत्या जगाची बाजारपेठ' या विषयावर मा. श्री उमेश राऊत यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पीपीटी प्रेझेंटेशनव्दारे मार्केटिंग कौशल्य मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर डॉ. भारत राठोड, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे व डॉ. प्रदीप भानसे उपस्थित होते. या नेटवर्क मार्केटिंगचे कौशल्य विकास कार्यक्रमाला रासेयो स्वयंसेवक व महाविद्यालयीन विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

- **दि. १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२ हा पंधरवडा "स्वच्छता ही सेवा " म्हणून साजरा**

स्वच्छता पंधरवडा अंतर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले.

१. अर्जुनी/मोर. ते तावशी जाणारा गावातील अत्यंत व्रर्दळीचा रस्ता परंतु या रस्त्याच्या दूतर्फा वाढलेली झुडपे, मैदी व काटेरी झाडे ये–जा करणाराला अडचणीची ठरत होती. हे लक्षात घेवून नगर पंचायतीला विश्वासात घेवून रासेयो स्वयंसेवकांच्या मदतीने स्वच्छ करण्यात आली.

२. 'प्लॅस्टिकचे निर्मुलन व दुष्परीणाम' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना किमान स्वत:च्या गावात त्याचे निर्मुलन करण्यासाठी मार्गदर्शक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्लॅस्टिक सारखा जैविक विघटन न होणारा कचरा घरोघरी एकत्र करून नष्ट करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यात आली. स्वच्छता शपथ घेण्यात आली.

३. अर्जुनी/मोर. शहरातून महाविद्यालयात येणारा मुख्य रस्ता स्वच्छ करण्यासाठी रासेयो स्वयंसेकानी पावसाळयात वाढलेल गवत काढून स्वच्छतेचा जागर केला. ठिकठिकाणी पडलेल्या प्लॅस्टिक पिशव्या व कचरा उचलून गोळा करण्यात आला.

तसेच नगर पंचायत ने ठिकठिकाणी या रस्त्यावर ठेवलेल्या कचराकुंडयातून बाहेर पडणारा कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.

- **२ ऑक्टोबर २०२२ : महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती कार्यक्रम**

श्री दुर्गा शिक्षण संस्थे अध्यक्ष श्री लुनकरनजी चितलांगे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. महापुरुषांच्या त्यागातून देश ऊभा आहे. इंग्रजांच्या विरोधात असहकार आंदोलन करुन अहिंसेच्या मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा लढा महात्मा गांधींनी ऊभारला. युवकांनी त्यांच्या कार्यतून प्रेरणा घवून उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करावी असे मौलिक विचार अतिथी डॉ. के.जे.सिबी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले व डॉ. शरउ मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून गांधी विचारधारा वरीक्षेत प्राविण्य प्राप्त महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. रासेयो च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिक चव्हान यानी तर आभार प्रदर्शन लोकेश बोरकर या विद्यार्थ्याने केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाइी प्रा. राजेश डोंगरवार, प्रा. कैलाश लोखंडे, रासेयो स्वयंसेवक अजित ठलाल, गिरीश ठोंबरे, शालीनी गेडाम प्रियंका लाडे, आदित्य वालदे, तनुजा कापगते, विशाल कोल्हे, दिव्या हेमने, प्रतिक चव्हान, यांनी परिश्रम घेतले.

- **१० ऑक्टोबर २०२२ राष्ट्रीय जंतनाशक दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास होण्याबरोबरच शारीरिक विकास होणेही महत्वाचे असते. त्यासाठी मैदानी खेळ महत्वाची भूमिका बजावतात. मैदानात खेळत असताना मुलांकडे निट लक्ष न दिल्यास अनेक आजारांना निमंत्रण मिळते. त्यामध्ये कृमिदोष हा लहान वयात होणारा व गंभिर आजार आहे. कृमीदोष मुलांना शारीरिकदृष्टया कमकुवत करतो. याचा थेट दुष्परीणाम मुलांच्या शारीरिक व वैयक्तिक विकासावर होतो. त्यामुळे मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढही खुंटते. अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यो कठीण जाते. याचे गांभीर्य लक्षात घेवून तो समुळ नष्ट करण्यासाठी शासन विविध उपक्रम राबविते. त्याच अनुषंगाने आरोग्य विभाग अर्जुनी/मोर. च्या वतीने दिनांक १० ऑक्टोबर २०२२ ला जंतनाशक दिनाचे औचित्य साधून १९ वर्षाखालील मुलामुलीना जंतनाशक या विषयावर मार्गदर्शन व गोळी वितरणाचा कार्यक्रम महाविद्यालयात संपन्न झाला. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र कोरंभीटोला उपकेंद्र अर्जुनी/मोर. येथील कर्मचारी श्रीमती हेमलता एम. डहारे, लक्ष्मी आर. मुनेश्वर, श्री एस. पी. गजबे, समीता एस. कुटारे यांनी महाविद्यालयात गोळयाचे वितरण करण्यास उपस्थिती दर्शविली. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे व रासेयो स्वयंसेवकान विशाल कोल्हे, अजित ठलाल, शालीनी गेडाम यानी हिरिरीने सहकार्य करुन कार्यक्रम यशस्वी केला.

- **१९ ऑक्टोबर २०२२ : प्लॉस्टिक कचरा संकलन अभियान व पथनाटय सादरीकरण**

महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या वतीने दि. १९ ऑक्टोबर २०२२ 'जग बदलले तुम्हीही बदला' या घेषवाक्याने अर्जुनी नगरी दुमदुमली. प्लॉस्टिक कचरा संकलन व निर्मूलन अभियान राबवून तसेच पथनाटय सादर करुन विद्यार्थ्यांनी लोकांचे

प्रबोधन केले. प्लॅस्टिक कचरा संकलनासाठी विशेष बॅग तयार करुन त्यात महाविद्यालयापासून रेल्वे स्टेशन, जुना बस स्टॅंड, पंचायत समिती परिसर, नवीन बस स्टॅंड परिसरातील जवळपास १ क्विंटल प्लॅस्टिक कचरा संकलित करुन महाविद्यालयातील कचरा डेपोत जमा करण्यात आल्या. कचरा संकलन करताना विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात आली. त्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राऊत यांनी हातमोजे प्रदान केले.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी नागरातील प्रमुख चौकात स्वच्छता व अमृत महोत्सवी प्रबोधनपर पथनाट्य सादर केले. यात प्लॅस्टिक प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, ग्राम स्वच्छता या विषयावर लोकांचे प्रबोधन करण्यात आले. यावेळी नगर पंचायतचे अर्जुनी/मोर. चे कर्मचारी अमोल जाधव, स्वाती तायडे, सुरेश बोरीकर, नगरसेवक सागर आरेकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, डॉ. प्रदिप भानसे, प्रा. कैलाश लोखंडे, प्रा. राजेश डोंगरवार, प्रा. लक्ष्मीकांत कापगते तसेच आजुबाजूच्या गावावरुन आलेले व नगरातील बहुसंख्येने लोक उपस्थित होते. पथनाटयात सहभागी शालीनी गेडाम, पंकज खोब्रागडे, विशाल कोल्हे, गिरीष ठोंबरे, श्रद्धा कुंभरे, रागिनी कापगते, किरण देशकर, प्रगती डोंगरवार, रागिणी पारसमोडे, पराग नंदेश्वर, करीना हाडगे, आरती मेश्राम, नितीन कोरे, प्राजक्ता मेश्राम, बादल गणविर, अजित ठलाल, द्रविड मेश्राम यांचे उपस्थितांनी कौतुक केले. पथनाटय निर्मितीसाठी रासेयो रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी परिश्रम घेतले. देशभक्तीपर गीतावर नृत्य करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

- **राष्ट्रीय एकता दिवस व श्रमदानाने सरदार पटेल जयंती साजरी**

दि. ३१ ऑक्टोबर २०२२ ल सरदार पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले यांनी यावेळी उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकता शपथ दिली. यावेळी मंचावर डॉ. सिबी, प्रा. नाकाडे, डॉ. डांगे, डॉ. दर्वे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दर्वे, प्रा. डोंगरवार यांनी केले. संचालन व आभारप्रदर्शन प्रतिक चौहान विद्यार्थ्याने केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सरदार पटेल जयंती निमित्याने अर्जुनी/मोर. रेल्वे स्टेशन परिसरात श्रमदान करण्यात आले.रस्त्याच्या दुतर्फा वाढलेला गवत पावडयाने काढून परिसर स्वच्छ करण्यात आले. दोन्ही उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गिरीष ठोंबरे, विशाल कोल्हे, शालिनी गेडाम दुष्यंत सुर्यवंशी, अजित ठलाल, पराग नंदेश्वर प्रतिक चव्हाण, श्रद्धा कुंभरे यांनी परिश्रम घेतले.

- **रासेयोच्या वतीने मतदार जनजागृती सायकल रॅली**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. ९ नाव्हेंबर २०२२ ला नवीन मतदार नोंदणी अभियानांतर्गत अर्जुनी/मोर. शहरातून मतदार जागृतीस्तव सायकल रॅली काढण्यात आली. मतदान हा प्रत्येकाचा अधिकार आहे. त्यापासून कोणही वंचित राहू नये म्हणून प्रमुख रस्त्यावरुन सायकल रॅली काढून लोकांना संदेश दिला. मतदार राजा

जागा हो, लोकशाहीचा धागा हो यासारखे नारे देत रॅली अर्जुनी/मोर. येथील एसडीएम डॉ. विजयकुमार सुर्यवंशी यांनी हिरवी झेंडी दाखवली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, प्रा. कैलाश लोखंडे, मतदान नोंदणी अधिकारी श्री गणेश सोनोने उपस्थित होते.

- **दि. १० नोव्हेंबर २०२२ ला श्रमदान करुन स्वच्छतेचा दिला संदेश**

आपल्या अवतीभोवतीच्या परिसरात प्रत्येकाने नियमित श्रमदान केले तर निरोगी आणि आनंदी जीवन जगता येते. स्वच्छतेने समृद्धी येते. श्रमसंस्काराचा भाग म्हणून शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात श्रमदान करुन स्वच्छतेचा संदेश दिला. कचरा व प्लॉस्टिक कचरा गोळा केला.

- **'संगीतातून सांप्रदायिक सद्भाव' या कार्यक्रमाचे आयेजन**

दि. २३ नोव्हेंबर २०२२ ला सांप्रदायिक सप्ताहाच्या निमित्याने 'संगीतातून सांप्रदायिक सद्भाव' या कायक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशात सांप्रदायिक सद्भाव वृद्धिंगत झाल्यास आपोआप जात, धर्म, पंथ, पक्ष यातील विषमता दूर होवून राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. असे मौलिक विचार याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले यानी व्यक्त केले. त्यानंतर रासेयो स्वयंसेवकानी भजन व सांप्रदायिक गीते सादर करुन राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले. तुकडोजी महाराज यांची बंधुभावाची शिकवण, एकमेका साहय करण्याचे औदार्य, गरीबांना मदतीचा हात देण्यातच ईश्वर आहे. या भावार्थाची भजने व गीते सादर करुन उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मने जिंकली.डॉ. के.जे. सिबी यांनीही समयोचित विचार व्यक्त केले. बादल गणविर, अजित ठलाल, शालिनी गेडाम, वैष्णवी नाकाडे यांनी गायलेल्या सुमधूर गीताना यामिना नागोसे व इतर सहकाऱ्यानी साजेसा कोरस दिला. तबलावादन बादल गणविर यांनी तर अजित ठलाल यांनी हार्मोनियमवर साथ दिली. पराग नंदेश्वर यांनी ऑर्गनवर सोबत केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रा. लक्ष्मीकांत कापगते यांनी मानले.

- **२६ नोव्हेंबर २०२२ : संविधान दिन कार्यक्रम**

विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने दि. २६ नाव्हेंबर २०२२ ला महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य प्रा. श्रीकांत नाकाडे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उद्देशिकेचे वाचन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदिप भानसे यांनी केले. प्रा. श्रीकांत नाकाडे यांनी संविधानातील मूलभूत कर्तव्य व अधिकार याविषयी आपले विचार व्यक्त केले. संचालन व आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदिप भानसे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, डॉ. प्रदिप भानसे, प्रा. कैलाश लाखंडे, प्रा. राजेश डोंगरवार, रासेयो स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व समान संधी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ डिसेंबर २०२२ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर

मोहुर्ले उपस्थित होते. सर्वप्रथम प्रा. मोहुर्ले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. याप्रसंगी इतिहास विभाग प्रमुख डॉ. कल्पना सांगोळे यांनी डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या विविध कार्यावर प्रकाश टाकला. प्रा. मोहुर्ले यांनीही आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या विविधांगी कार्याचा उपस्थितांना परिचय करुन दिला. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी केले.

- **सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम**

महाविद्यालयात रासेयोच्या वतीने दि. ३ जानेवारी २०२३ ला सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. श्रीकांत नाकाडे उपस्थित होते. प्रा. नाकाडे यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विद्यादानाच्या कार्यामुळे आपणास बुद्धिजीवी होता आले. विद्येशिवाय जितीजागती माणसेही मती, निती व गतिहीन होतात.त्यामुळे शिक्षण घेवून त्याचा जगण्यासाठी वापर करावा, बुद्धीप्रामाण्यावादी बनावे, असे मौलिक विचार व्यक्त केले. यावेळी मयुरी गौतम या विद्यार्थीनीने सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. ती म्हणली की, विद्यादानाचे कार्य खऱ्या अर्थाने सावित्रीबाईनी केल्यामुळेच आज स्त्रिया आणि मुली सर्वच क्षेत्रात भरारी मारताना दिसत आहेत. त्यामुळे विद्येची देवता म्हणून सावित्रीबाईच्या कार्याचे स्मरण केले पाहिजे. या कार्यक्रमाचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदिप भानसे यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. मोतीलाल दर्वे यांनी केले. कार्यक्रमाला रासेयो स्वयंसेवक, महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी लोकेश बोरकर, छुन्नी भेंडारकर, वैष्णवी बोरकर यांनी परिश्रम घेतले.

- **८ मार्च २०२३ : जागतिक महिला दिन** ८ मार्च २०२३ ला महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्याने नेवजाबाई हितकारीणी महाविद्यालय ब्रम्हपुरी यंथील प्रा. मनिषा लेनगुरे यांच्या 'मी सावित्री बोलतेय' या एकपात्री नाटय प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री बद्रिप्रसादजी जायस्वाल उपस्थित होते.

- **'आझाद हिंदची गाथा' नाटकाचे सादरीकरण**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी महाराष्ट्रातील एक हजाराहून अधिक विद्यार्थी कलाकार आणि नाटयनिर्मिते महाराष्ट्राच्या ३६ जिल्हयात एकाच दिवशी ७५ महाविद्यालये, ७५ ठिकाणी, ७५ नाटयप्रयोग सादर करण्यात आले. या अनोख्या प्रकल्पात महाराष्ट्र सांस्कृतिक संचालनालय, राष्ट्रीय सेवा योजना आणि आर्टिस्टिक हयुमेन्स यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. २३ मार्च २०२३ ला दुपारी १२.०० वाजता नाटकाचे आयोजन करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आयोजित या नाटयकलेचा आस्वाद घेण्यासाठी नगरातील नागरीक, महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते. नाटकाच्या आरंभी अर्जुनी/मोर. चे एसडीएम डॉ. विजयकुमार सुर्यवंशी, श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लुनकरनजी चितलांगे, उपाध्यक्ष श्री बद्रीप्रसादजी जायस्वाल, सदस्य डॉ. कैलाशजी गाडेकर, प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला. मान्यवरांची याप्रसंगी विद्यार्थी कलाकारांचे कौतुक केले. प्रास्ताविक व आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.

मोतीलाल दर्वे यांनी मानले. यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे, डॉ. प्रदिप भानसे, प्रा. कैलाश लोखंडे, प्रा. राजेश डोंगरवार, प्रा. लक्ष्मीकांत कापगते, रासेयोचे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

## देशोन्नती

### आझाद हिंदची गाथा नाटकाचे सादरीकरण

**केशोरी** ■ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी महाराष्ट्रातील एक हजाराहून अधिक विद्यार्थी, कलाकार आणि नाट्यनिर्मिती महाराष्ट्राच्या छत्तीस जिल्ह्यात एकाच दिवसी ७५ महाविद्यालये, ७५ ठिकाणी, ७५ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. या अनोख्या प्रकल्पात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, राष्ट्रीय सेवा योजना आणि आर्टिस्टिक ह्यूमन्स यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दिनांक २३ मार्च २०२३ ला दुपारी १२.०० वाजता नाटकाचे आयोजन करण्यात आले.

सदर नाटक गोंदिया जिल्ह्यातील शिवप्रसाद सदानंद जयस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोरगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सादर केला. ज्यांनी या कार्यक्रमाची कल्पना केली, त्या आर्टिस्टिक ह्यूमन्सचे संस्थापक आणि संचालक, श्री दर्शन महाजन यांनी ही संधी निर्माण करून सर्वांना एका समान व्यासपीठावर आणले.



रंगभूमी हे सर्वांना एकत्र आणण्याचे सर्वात मोठे माध्यम आहे. हे प्रत्यक्षात दाखवून दिले.

नाटकाच्या सुरूवातीला अर्जुनी/मोरगाव उपविभागीय अधिकारी डॉ.विजयकुमार सूर्यवंशी, श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लुनकरण चितलांगे, उपाध्यक्ष बद्रीप्रसाद जयस्वाल, सदस्य डॉ. कैलाश गाडेकर, प्राचार्य डॉ.ईश्वर मोहुर्ले यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला. मान्यवरांनी समयोचीत विचार व्यक्त केले. प्रास्ताविक व आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मोतीलाल दर्वे यांनी केले. यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.मोतीलाल दर्वे, डॉ.प्रदीप भानसे, प्रा.कैलास लोखंडे, प्रा.राजेश डोंगरवार, प्रा. लक्ष्मीकांत कापगते, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले. नाटकात सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे उपस्थितांनी कौतुक केले. स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आयोजित या नाट्यकलेचा आस्वाद घेण्यासाठी शहरातील नागरीक, विद्यार्थी, शिक्षक प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Deshonnati Edition
Mar 26, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

- **नव मतदार नाव नोंदणी अभियानात सहभाग –**

दि. २५ मार्च २०२३ ला प्राप्त झालेल्या तालुका मतदार नाव नोंदणी अधिकारी यांच्या पत्रानुसार व मतदार नाव नोंदणी अभियाना अंतर्गत १७ वर्ष पूर्ण केलेल्या व १८ वर्ष होवूनही ज्यांनी मतदार यादीत नाव नोंदणीसाठी आवेदन भरले नाही अशा नवीन मतदारांची माहिती गोळा करण्यासाठी रासेयो पथकातील श्रद्धा कुंभरे, विशाल कोल्हे या स्वयंसेवकानी परिश्रम घेतले. गुगल फॉर्म तयार करुन संबंधित विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे जमा करण्यात आले. व पुढील कार्यवाहीसाठी तालुका मतदार अधिकारी यांना सादर करण्यात आले.

- **विविध शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग**

महाविद्यालयातील रासेयो पथकातील स्वयंसेवक वेगवेगळया शिबीरात सहभागी होण्यासाठी पाठविले जातात. यावषी कवियत्री बहिनाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे झालेल्या **'आव्हान–चान्सलर्स ब्रिगेड : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण'** शिबिरात बादल गणविर, वैष्णवी बोरकर, विशाल कोल्हे व लोकेश बोरकर हे चार विद्यार्थी सहभागी झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने घेतलेल्या **राष्ट्रीय एकता शिबिरात** मानसी होमदेव नेवारे ही विद्यार्थीनी सहभागी झाली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने घेतलेल्या **प्रेरणा राज्यस्तरीय शिबिरात** कृपाली यदुनाथ गुरनुले ही विद्यार्थीनी सहभागी झाली. कमला नहरु महाविद्यालय नागपूर व्दारा आयोजित **आमगाव देवळी राज्यस्तरीय शिबिरात** कुनाल आरसोडे व किरण देशकर हे दोन विद्यार्थी सहभागी झाले. विद्या विकास महाविद्यालय समुद्रपूर व्दारा आयोजित **लसनपूर राज्यस्तरीय शिबिरात** मानसी नेवारे

व कार्तिक मेश्राम हे दो विद्यार्थी सहभागी झाले. आमचे महाविद्यालयाने आयाजित केलेल्या राज्यस्तरीय शिबीर निमगाव येथे पथकातील विद्यार्थी सहभागी झाले.

अशाप्रकारे रासेयो विभागाच्या वतीने वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात आले. यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रमुख अजित ठलाल, गिरीश ठोंबरे, विशाल कोल्हे, विद्यार्थीनी प्रमुख शालीनी गेडाम, श्रद्धा कुंभरे तसेच गृप लिडर्स व इतर सर्व स्वयंसेवकाचे परिश्रम, महाविद्यालयातील मा. प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले यांचे सहकार्य, विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सोपानदेव पिसे व त्याच्या कर्मचारी वर्गाचे वेळोवेळी मिळालेले सहकार्य व मार्गदर्शन आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप भानसे, प्रा. कैलाश लोखंडे, प्रा. राजेश डोंगरवार, डॉ. भारत राठोड, डॉ. के.जे. सिबी यांच्या सोबतीने वर्षभराच्या कामाचे निट केलेल नियोजन यामुळे नियमित कार्यक्रमांचे यशस्विरित्या आयोजन करता आले.

N.S.S.Program Officer
S.S.Jaiswal College
Arjuni/Mor.Dist.Gondia

रासेयो कार्यक्रम अधिकारी

डॉ. मोतीलाल रा. दर्वे
डॉ. प्रदिप रा. भानसे
प्रा. कैलास एस. लोखंडे

Principal
S.S.J. College
Arjuni/Mor, Dist. Gondia

प्राचार्य

डॉ. ईश्वर एस. मोहुर्ले

# शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर. जि. गोंदिया
# राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय विशेष शिबीर निमगाव
## अहवाल सत्र २०२२–२३
## दि. १३ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२३

विद्यार्थ्यांचे सर्वांगिण व्यक्तिमत्व घडवून आणण्याचा एक विचारमंच म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेकडे बघितले जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित होऊन राष्ट्राच्या समर्पणाची व सेवेची भावना निर्माण होते. शैक्षणिक सत्र २०२२–२३ मध्ये आमच्या महाविद्यालयाने विद्यापीठाला पाठविलेल्या प्रस्तावानुसार व शासनाच्या प्राप्त मान्यतेनुसार दि. १३ ते १९ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत मौजा निमगाव ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया येथे २०० स्वयंसेवकांचे सहभागातून राज्यस्तरीय शिबीराचे आयोजन केले गेले.

- **शिबीराचा उद्‌घाटन समारंभ** :

शिबिराचे उद्‌घाटन दि. १३ फेब्रुवारी २०२३ ला अर्जुनी/मोर. विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री मनोहरजी चंद्रिकापुरे यांच्या हस्ते व श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लुनकरणजी चितलांगे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्था सचिव श्री मुकेशकुमार जायस्वाल, निमगावचे सरपंच श्रीमती वंदेश्वरी राऊत, उपसरपंच श्री संदीपजी पुस्तोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले, विधीसभा सदस्य प्रा. पांडुरंग डांगे, आयक्युएसी समन्वयक डॉ. के. जे. सिबी यासाठी प्रामुख्याने उपस्थित होते.

उद्‌घाटन कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मा. डॉ. सोपानदेव पिसे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा मा. प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. डॉ. पिसे यांनी आपल्या भाषणातून सामाजिक दायित्वाची जाणीव आपल्याला देण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना करते. आपण देशाला काही देणे लागतो. आपल्याजवळ असलेल्या त्रोटक संसाधनांचा वापर करुन अधिकाधिक विकास आपण केला पाहिजे. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाने आपल्याजवळ असलेली क्षमता वापरावी. असे महत्वपूर्ण विचार डॉ. सोपानदेव पिसे यांनी मांडले.
महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही समाजसेवेसाठी युवकांची चळवळ आहे आणि या चळवळीच्या माध्यमातून देशाचा विकास साधता येतो, असे मौलिक विचार व्यक्त केले. राज्यस्तरीय शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी निमगावच्या सरपंच श्रीमती वंदेश्वरी राऊत यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर निमगावात यशस्विपणे राबविण्यासाठी सर्व गावकरी आपल्या पाठीशी उभे राहतील असे आश्वासन दिले. याप्रसंगी डॉ. पांडुरंग डांगे, सिनेट सदस्य रा. तु. म. नागपूर विद्यापीठ नागपूर, मुख्याध्यापक मा.श्री ओमप्रकाश पवार यांचीही समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री लुणकरणजी चितलांगे यांनी सर्व शिबिरार्थ्यांना शिबिर यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उद्‌घाटन कार्यक्रमाला श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री मुकेशजी जायस्वाल निमगावचे उपसरपंच श्री संदीपजी पुस्तोडे, सदस्य श्रीमती वर्षाताई गेडाम, श्री मिलींदजी मेश्राम, गावातील नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी जि.प. वरीष्ठ प्राथमिक शाळा मुख्याध्यापक श्री बि.एम. ब्राम्हणकर, ग्रामसेवक

श्री संतोषजी परमार, माजी सरपंच श्री विश्वनाथ बाळबुद्धे हे प्रामुख्याने उपस्थित होते. गावातील वेगवेगळया समित्यांचे पदाधिकारी देखील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबिर प्रमुख डॉ. एम. आर. दर्वे यांनी केले. संचालन डॉ. बी. एम. राठोड यांनी केले. तर आभार शिबिर संयोजक डॉ. प्रदिप भानसे यांनी मानले.

- **योगासने व प्राणायाम सत्र** : शिबिरादरम्यान सकाळी ५ वाजतापासून तर रात्री १० वाजेपर्यंत विविध सत्रांच्या माध्यमातून शिबिरार्थ्यांना संस्कारीत करण्यात आले. युवकांनी संकल्प सिद्धीसाठी योगरुपी त्रिवेणीची कास धरावी. आजच्या बदलत्या सामाजिक संकल्पना तसेच स्पर्धेचे युग लक्षात घेता शरीर व मनाचे संतुलन साधणे आवश्यक आहे. योग सर्वसमावेशक असून विद्यार्थ्यांनी संकल्प सिद्धीकरिता स्वत:ला ध्यान केंद्रित करावे त्यासाठी सकाळी योगकर्माशी जोडले तर दिवसभर कर्मयोग करता येईल त्यासाठी युवकांनी योग, प्राणायाम व ध्यान हया त्रिवेणीशी जोडून घ्यावे असे मौलीक मार्गदर्शन जय दुर्गा हायस्कुल गौरनगरचे योगशिक्षक श्री कांतीकुमार बोरकर यांनी केले. शिबीरात दररोज सकाळी ५.०० प्रार्थना झाल्यानंतर शिबिरार्थ्यांना योगासने व प्राणायामाचे धडे देण्यात आले. संपूर्ण दिवसभर उत्साहपूर्ण काम करण्यासाठी दैनंदिन जिवनात व्यायामाला महत्व देणे किती गरजेचे आहे. हा संस्कार रुजविण्यासाठी श्री कांतीकुमार बोरकर यांना निमंत्रित करण्यात आले. हे सत्र सकाळी ६.०० ते ७.१५ वाजेपर्यंत चालत असे. या सत्राला शिबिरार्थी व गावकरी सहभागी झाले.

- **श्रमसंस्कार सत्र_**: शिबिरात सहभागी २०० शिबीरार्थ्यांच्या हस्ते श्रमदानाच्या माध्यमातून निमगाव स्मशानभूमिकडे जाणारा ५०० मिटर लांबीचा रस्ता मातीकाम करुन जाण्यायोग्य बनविला. जवळपास दोन लक्ष रुपयाचे हे काम शिबिरार्थ्यांनी हाती घेवून ते सात दिवसात पूर्ण केले. स्मशानभूमित वृक्षारोपण करुन सुंदरता प्रदान केली. यासोबतच निमगावातील रस्ते व नाल्या स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. दररोज सकाळी ८ ते १२ या वेळेत शिबिरार्थी श्रमदानासाठी जात असत. त्यांच्या सोबतीला गावकरीही आले. एकत्र येवून काम केल्यास एक मोठे काम पूर्णत्वास जावू शकते याचा प्रत्यय शिबिरार्थ्यांना यातून आला.

- **बौद्धिक सत्र_**: दुपारी २.०० ते ४.०० या दरम्यान रोज बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले. विविध क्षेत्रात तज्ञ अभ्यासकांची व्याख्याने व उद्‌बोधन शिबिरार्थ्यांना समाजसेवा करण्यासाठी शिदोरीच ठरली. गाव विकासासाठी उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या तज्ञ मंडळींची व्याख्याने आयोजित करण्यात आली. दि. १४/०२/२०२३ ला श्री संताजी महाविद्यालय पालांदूरचे प्रा. डॉ. रवि पाटेकर यांनी 'मानव वन्यजिव संघर्ष व उपाय' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच अर्जुनी/मोर. महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गोपाल पालीवाल यांचेही 'प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन व उपाय' या विषयावर अभ्यासपूर्ण उद्‌बोधन घेण्यात आले. दि. १५/०२/२०२३ :ला चोपा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश धोटे यांनी 'अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर मार्गदर्शन केले. याच दिवशी गोंदिया येथील प्रकल्प अधिकारी श्रीमती दिशा मेश्राम गोंदिया यांनी 'महिलांच्या समस्या व निराकरण' या विषयावर उद्‌बोधन केले. दि. १६/०२/२०२३ ला सिटी प्राईड कॉलेज नागपूरचे प्राचार्य डॉ. दिलीप काकडे यांचे 'माणसात देव शोधणारा संत –गाडगेबाबा' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. दि. १७/०२/२०२३ जा आदर्श ग्राम राजगडचे सरपंच श्री चंदू पाटील मारकवार यांनी ग्राम–शहर विकासात लाेकांचा सहभाग या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी विचारपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले अध्यक्षस्थानी होते. त्यांनी शिबिरार्थ्यांना समयोचित मार्गदर्शन केले. या

बौद्धिक सत्राचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय शिबिर प्रमुख डॉ. मोतीलाल दर्वे यांनी तर प्रा. राजेश डोंगरवार यानी आभार मानले. दि. १८/०२/२०२३ ला अडयाळ टेकडीचे संचालक श्री सुबोधदादा यांनी 'ग्रामोन्नतीसाठी युवाशक्ती' या विषयावर मार्गदर्शन करताना 'गाव हा विश्वाचा नकाशा, गावावरुन देशाची परीक्षा, गावची भंगता अवदशा, येईल देशा' हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे वचन गावाला दुर्दशा येवू नये यादृष्टीने महत्वाचे कसे आहे. यासाठी युवाशक्तीने आपले सर्वोच्च योगदान दिले पाहिजे. कारण राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जो युवक संस्कारीत होतो त्या युवकाची ही जबाबदारी आहे की, आपण ज्या गावात राहतो त्या गावाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी आपली संपूर्ण क्षमता वापरुन योगदान दिले पाहिजे. गाव समृद्ध होतील तेव्हाच भारत समृद्ध होईल. कारण भारत खेडयांचा देश असल्यामुळे खेडयांची उन्नती हीच देशाची उन्नती आहे. असे मौलिक मार्गदर्शन केले.

- **प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम** : दररोज रात्री ८ ते १० या वेळेत ग्रामवासियांसाठी विविध प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. दि. १८/०२/२०२३ ला प्रबोधनात्मक पथनाटये सादर करण्यात आली. लेझीम, वारी, दिंडी व विविध झाकी स्वरुपाने गावाला प्रबोधित करण्यासाठी हे उपक्रम साहयभूत ठरले. अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनाधिनता, हुंडाबळी, शेतकरी आत्महत्या, पर्यावरण प्रदुषण यासारख्या विषयाना विशेष स्थान देण्यात आले
- **रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिर** : या शिबिरात दि. १६/०२/२०२३ ला रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे. हा विचार याप्रसंगी शिबिर प्रमुख डॉ. मोतीलाल दर्वे यांनी रक्तदात्यांच्या मनावर कोरला. यासाठी लाईफ लाईन ब्लड बॅंकेला निमंत्रित करण्यात आले. शिबिरातील शिबिरार्थी व निमगावातील युवक वर्ग रक्तदानासाठी पुढे आल्याने ५० रक्तदात्यांचे रक्त घेण्यात आले.
- आरोग्यविषयक **तपासणी शिबिर :** निमगाव येथिल महिलंसाठी आरोग्यविषयक तपासणी शिबिरही घेण्यात आले. यासाठी चान्ना/बाक्टी येथिल आरोग्य अधिकारी डॉ. श्वेता कुलकर्णी, डॉ. वैशाली नाकाडे व त्यांची चमु उपस्थित होती. महिलंच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेवून त्याच्या निराकरणासाठी औषधे वितरीत करण्यात आली.
- **शिबिराचा समारोपीय समारंभ** :शिबिराचा समारोपीय कार्यक्रम दि. १९/०२/२०२३ ला श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री लुणकरणजी चितलांगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. विशेष अतिथी म्हणून ने.हि. महाविद्यालय ब्रम्हपुरीचे प्राचार्य डॉ. नामदेवराव कोकोडे, से. नि. सहसचिव तथा आंतरवित्तीय सल्लागार सा. बां. विभाग मंत्रालय मुंबईचे श्री फुलचंद मेश्राम, सरपंच श्रीमती वंदेश्वरी राऊत, जिल्हा परिषद सदस्य श्री लायकराम भेंडारकर, पंचायत समिती सदस्य श्री संदिपजी कापगते, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले, आयक्युएसी समन्वयक डॉ. के. जे. सिबी, श्री दुर्गा शिक्षण संस्थेचे सदस्य डॉ. कैलासजी गाडेकर, मुख्याध्यापक श्री बी. एम. ब्राम्हणकर, पोलीस पाटील श्री संजयजी कापगते, गोंडवाना विद्यापीठातून शिबिरार्थ्यांना घेवून आलेले शरद पवार महाविद्यालय गडचांदूरचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. शरद बेलोरकर, सोलापूर विद्यापीठातून आलेले रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. बबन गायकवाड, गोंदिया जिल्हा समन्वयक डॉ. प्रविण चंद्रगिरीवार आदी उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. कोकोडे म्हणाले की, भारत हा खेडयांचा देश आहे. आजच्या युवकांनी उच्च शिक्षण घेउन नोकरीच्या मागे न लागता उद्योग व स्वयंरोजगारासाठी पुढे आले पाहिजे. कारण आपल्या देशात संसाधने मुबलक आहेत पण त्याचा वापर होताना दिसत नाही. युवक नोकरी मिळत नाही म्हणून निराश होतो आहे. परंतु युवकांनी आपल्या क्षमता ओळखून त्याचा योग्य ठिकाणी वापर केला पाहिजे. या शिबिरातून आपण जे मिळविले त्याचा आपणास ध्यास लागला तर ग्राम आणि शहरांचा विकास होण्यास उशिर लागणार नाही. असे मौलिक मार्गदर्शन डॉ. कोकोडे यांनी शिबिरार्थ्यांना केले.

शिबिरादरम्यान राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमात उत्कृष्ठ सहभागाबद्दल शिबिरार्थ्यांना अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देवून गौरविण्यात आले. तर सर्व सहभागी शिबिरार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. शिबिरार्थ्यांना टि शर्ट व कॅप देण्याचे प्रायोजकत्व अर्जुनी/मोर. विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री मनोहरजी चंद्रिकापुरे यांनी स्विकारले. रा.तु.म. नागपूर विद्यापीठातील सिनेट सदस्य व महाविद्यालयातील प्रा. डॉ. पांडुरंग डांगे यांनी शिबिरार्थ्यांना फोल्डर, पॅड व पेन प्रदान केला. से. नि. सहसचिव तथा आंतरवित्तीय सल्लागार सा.बां. विभाग मंत्रालय मुंबईचे श्री फुलचंद मेश्राम यांनी .डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन चरीत्रावर आधारीत पूस्तक देण्याचे प्रायोजकत्व स्विकारले. तुकडोजी महाराज यांची ग्रामगिता देण्याचे प्रायोजकत्व महाविद्यालयातील प्रा. डॉ. राजेश चांडक यांनी स्विकारले. शिबिरार्थ्यांना ओळपत्र देण्याचे प्रायोजकत्व महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. अजय राऊत यांनी स्विकारले. या सर्वांच्या औदार्याबद्दल शिबिर प्रमुख डॉ. मोतीलाल दर्वे यांनी आभार मानले.

शिबिराच्या यशस्वितेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.सोपानदेव पिसे यांचे विशेष सहकार्य लाभले. निमगाव ग्रामपंचायतचे सरपंच श्रीमती वंदेश्वरी राऊत, उपसरपंच श्री संदीपजी पुस्तोडे, सर्व ग्रा. पं. निमगावचे सदस्य, माजी सरपंच श्री विश्वनाथ बारबुद्धे, नवयुवक बहुउद्देशिय मंडळ निमगाव आणि गावातील विविध मंडळे व ग्रामवासीयांनी विशेष सहकार्य केले. शिबिर यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ईश्वर मोहुर्ले यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. शिबिर संयोजक डॉ. प्रदीप भानसे, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. कैलाश लोखंडे, प्रा. राजेश डोंगरवार, डॉ.भारत राठोड यांनी अथक परिश्रम घेतले. महाविद्यालयातील रा.से.यो. स्वयंसेवक शालीनी गेडाम, विशाल कोल्हे, यामिना नागोसे,, गिरीश ठोंबरे, वैष्णवी बोरकर, श्रीवर्धन गोंडाणे, धिरज रंगारी, श्रद्धा कुंभरे, शशिकांत गेडाम, गोपाल बाळबुद्धे आदींनी परिश्रम घेतले. उद्घाटन व समारोपिय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. भारत राठोड यांनी केले. समारोपिय कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबिर संयोजक डॉ. प्रदीप भानसे यानी तर सर्वांचे आभार शिबिर प्रमुख डॉ. मोतीलाल दर्वे यांनी मानले. राष्ट्रवंदनेने शिबिराची सांगता झाली.

N.S.S. Program Officer
S.S.Jaiswal College
Arjuni/Mor.Dist.Gondia
कार्यक्रम अधिकारी

डॉ. मोतीलाल रा. दर्वे

डॉ. प्रदिप रा. भानसे

प्रा. कैलाश शं. लोखंडे

Principal
S.S. Jaiswal College
Arjuni/Mor, Dist. Gondia
प्राचार्य
डॉ. ईश्वर एस. मोहुर्ले